**<u>प्रस्तावना</u> :- सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षातील झालेल्या नाले सफाई कामाचे देय अदा करणे बाबत पुर्नविनियोजन करणेसाठी मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे बाबत.**

प्रभाग समिती क्र.१ ते ७ च्या कार्यक्षेत्रात बंदिस्त व उघड्या स्वरुपाचे लहान मोठे-नाले असुन या नाल्या मध्ये मोठया प्रमाणात गाळ व केरकचरा साठलेला दिसुन येत आहे.सदर नाल्यांची सफाई करणे कामी तसेच मुख्य नाले लगत असलेले १०० मिटर पर्यंतचे लहान नाले सुद्धा संबंधित ठेकेदार यांचे कडुन सफाई करणेसाठी निविदा मागवुन नियुक्त ठेकेदारा मार्फत प्रभाग समिती क्र.१ ते ७ च्या कार्यक्षेत्रातील नाले सफाईचे काम पुर्ण झाले आहे.

शहरातील नाले सफाई कामासाठी सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षातील नाले सफाई मधुन गाळ केरकचरा काढणे या लेखा शिर्षका खाली रु.२०० लक्ष मंजुर करण्यात आले होते.मंजुर लेखा शिर्षका मध्ये आजमितीस निरंक तरतदु आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क) ९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी तरतदु करणे हे मा.आयुक्त सो. यांचे अधिकार आहेत.त्याच प्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९७ व ९६ प्रमाणे दर वर्षी उत्पन्न व खर्च यांचे अंदाजपत्रक तयार केले जातात त्याप्रमाणे सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्षक निहाय आर्थिक तरतुद करण्यात आली होती.या तरतुदी मधुन आता पर्यंत खर्च करण्यात आलेला आहे.त्याचा तपशील खालील प्रमाणे नमुद आहे.

| अ.क्रं | लेखाशिर्षाचे नांव | सन २०२२-२३ करिता करीता करणेत आलेली तरतुद | सन २०२२-२३ मध्ये झालेला प्रत्यक्ष खर्च | शिल्लक | पुर्नवियोजन |
|---|---|---|---|---|---|
| १ | नाला गटारातील गाळ काढणे | २००.०० लक्ष | रु.२०० लक्ष | निरंक | उपलब्ध |

सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात जो अर्थसंकल्प मंजूर झाला त्या अर्थसंकल्पामध्ये नाला गटारातील गाळ काढणे, या लेखाशिर्षकामध्ये कामाच्या सोयीच्या दृष्टीने आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे. वर तक्त्यात नमूद काम निधी अभावी प्रलंबित आहेत. सदर लेखा शिर्षकामध्ये पुर्नविनियोजन करावयाचे आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०२ कलम १०३ व कलम १०४ अन्वये एखादया लेखाशिर्षामधील रक्कम खर्च झाली नसेल तर या नियमाच्या आधारे अनुदानाच्या तुलनेत जादा होणारा खर्च बचतीच्या रक्कमांचा उपयोग करुन भागवीता येवू शकतो व असे पुर्नविनियोजन करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो. यांना आहेत.

आरोग्य व स्वच्छता विभाग मुख्यालय कडील भटकी कुत्रे व डुकरे पकडुन त्यांना रेबिज प्रतिबंधक लस देणे या लेखाशिर्षा खाली सन २०२२-२३ या अर्थिक वर्षात ३० लक्ष ठेवण्यात आले आहेत त्यापैकी सदर लेखाशिर्षामध्ये खर्च झालेला नाही त्यामुळे रु.३० लक्ष रक्कम अखर्चीत आहे

त्यापैकी नाला गटारातील गाळ काढणे लेखाशिर्षकात रु.३० लक्ष या लेखाशिर्षात पुर्नविनियोजन करणेकरीता आरोग्य व स्वच्छता विभाग़ाकडून प्रस्तावित करण्यात आले आहे.

नाला गटारातील गाळ काढणे या लेखशिर्षकाकरीता पुर्नविनियोजन करणे आवश्यक असून त्याचा स्वतंत्र्य सोबत नमुना नं १० ठेवले असून त्याचप्रमाणे पुर्नवियोजन करिता मा.महासभा अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२(अ) च्या (१ ब) नुसार मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळावी ही विनंती,

प्रशासकिय ठराव क्र. ८७ दि. ३/२/२०२३

आरोग्य व स्वच्छता विभाग मुख्यालय कडील भटकी कुत्रे व डुकरे पकडुन त्यांना रेबिज प्रतिबंधक लस देणे या लेखाशिर्षा खाली सन २०२२-२३ या अर्थिक वर्षात ३० लक्ष ठेवण्यात आले आहेत त्यापैकी सदर लेखाशिर्षामध्ये खर्च झालेला नाही त्यामुळे रु.३० लक्ष रक्कम अखर्चीत आहे त्यापैकी नाला गटारातील गाळ काढणे लेखाशिर्षकात रु.३० लक्ष या लेखाशिर्षका मधुन पुर्नविनियोजन करणेकरीता मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे बाबत विनंती आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग२)/ नवि,दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ(१अ)व १(ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार (महासभा व स्थायी समितीचे अधिकार) मी विजयकुमार म्हसाळ प्रशासक तथा आयुक्त,भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, आरोग्य व स्वच्छता विभाग मुख्यालय कडील भटकी कुत्रे व डुकरे पकडुन त्यांना रेबिज प्रतिबंधक लस देणे या लेखाशिर्षा खाली सन २०२२-२३ या अर्थिक वर्षात ३० लक्ष ठेवण्यात आले आहेत त्यापैकी सदर लेखाशिर्षामध्ये खर्च झालेला नाही त्यामुळे रु.३० लक्ष रक्कम अखर्चीत आहे त्यापैकी नाला गटारातील गाळ काढणे लेखाशिर्षकात रु.३० लक्ष या लेखाशिर्षात पुर्नविनियोजन करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**